# देवी पूजा विधी

**निवेदन**

खालील लेख हा केवळ पूजासंबंधी उपचारांची माहिती व्हावी या उद्देशाने गठित केलेला असून, भक्तांनी याचा सूचना किंवा सल्ला म्हणून वापर करू नये. खालील माहिती हे सार्वजनिक स्रोतातून संकलित केली असून भक्तांनी याचा वापर वैयक्तिक जबाबदारी वर करावा. श्रीदेवी चामुंडेश्वरी समिती या लेखातील मजकुराच्या सत्यता व परिणामकारकता इत्यादीसाठी जबाबदार नाही. धार्मिक पूजापद्धती या वेदशाळा अथवा तत्सम धार्मिक शास्त्रासंबंधी ज्ञानदान करणाऱ्या संस्थांमधून शिकणे योग्य आहे. खालील लेखाच्या वाचनाने अथवा अनुकरणाने कोणास काही शारीरिक किंवा मानसिक त्रास, अनिष्ट परिणाम व जीवितहानी व आर्थिक झीज, तोशीस, खर्च झाल्यास श्रीदेवी चामुंडेश्वरी समिती जबाबदार नाही याची नोंद घ्यावी.

## देवी पूजेतील घटकांचा अनुक्रम

1. पूजा साहित्य गोळा करणे व त्याची मांडणी करणे.
2. दीपपूजन
3. घंटापूजन
4. प्रोक्षण (तुळशीपत्र व फुलांच्या साहाय्याने पूजासामुग्रीवर जल शिंपडणे)
5. संकल्प
6. आवाहन
7. ध्यान
8. आसन देणे
9. पाध्यम (पाद्य प्रक्षालन करणे)
10. अर्घ्यं देणे
11. आचमन (आचमनासाठी पाणी देणे)
12. पंचामृतस्नान
13. शुद्धोदकस्नान
14. वस्त्रार्पण
15. आभूषणअर्पण
16. हळद आणि कुंकू वाहणे
17. चंदनतिलक
18. फुले वाहणे
19. धूप ओवाळणे
20. दीप ओवाळणे
21. नैवेद्य
22. विडासुपारी
23. नीरांजन ओवाळणे
24. प्रदक्षिणा (स्वतःभोवती किंवा मूर्तीच्या सभोवताली जागा असल्यास मूर्तीभोवती)
25. नमस्कार
26. देवीस्तुती किंवा स्तोत्रपठण
27. क्षमायाचना

## साधकाने खालील पूजासाहित्य पूजेची पूर्वतयारी म्हणून गोळा करावे.

1. देवीची मूर्ती अथवा फोटो

२. कुंकुम

३. हळद

४. चंदन

५. कार्पासवस्त्र (कच्या कापूसतंतूंची हळद व कुंकुमयुक्त माला)

६. नारळ

७.फळे (ऋतूप्रमाणे)

८.विडा

९.सुपारी

१०. पंचामृत

११. बेलपत्र आणि तुळशीपत्र

१२. सुटे पैसे

१३. कलश

१४. पळी

१५. पंचपात्री

१६. ताम्हण

१७. फुले

१८. नीरांजन

१९. कापूर

२०. धूप

२१.नैवेद्य (साधकाने स्वइच्छेनुसार व परवडेल असा बनवलेला गोड पदार्थ)

२२. घंटा

२३. दिव्यासाठी तूप किंवा तीळ तेल

२४. अक्षता (हळद आणि कुंकू मिश्रित कच्चे तांदूळ)

२५. शंख

**<u>भक्तांना विनम्र सूचना –</u>**

- सहसा देवीला गंध, हळद अथवा कुंकुम लावताना अनामिकेचा किंवा अनामिकेसहित अंगठ्याचा वापर करतात.
- स्वतःला गंध लावताना मध्यमेचा वापर करावा असा संकेत आहे.
- दोन्ही प्रसंगी तर्जनीचा वापर करू नये असे सांगितले जाते.
- पूजा करणाऱ्या व्यक्तीने स्नान करून व धूतवस्त्र नेसून श्रीदेवीच्या मूर्तीची अथवा चित्राची उच्चासनावर स्थापना करावी.
- पूजा करावयाची जागा स्वच्छ पुसून घेतलेली असावी.
- पूजा साहित्याची मांडणी केल्यावर पूजाविधी खालील प्रमाणे करावा.

# <u>पूजाविधी</u>

सुरुवातीला भक्तियुक्त अंत:करणाने श्रीगणेशाला व देवीला स्मरण करून आचमन करावे.

तांब्यातील पाणी पंचपात्री म्हणजे पेल्यात ओतून पळीने उजव्या तळहातावर घेऊन तीनदा खालील नावे घेऊन प्राशन करावे.

ॐ केशवाय नमः ॐ नारायणाय नमः ॐ माधवाय नमः

नंतर ॐ गोविन्दाय नमः असे म्हणून एक पळी पाणी उजव्या तळहातातून ताम्हणात सोडावे. नंतर हात जोडून खालील नावे म्हणावीत.

ॐ विष्णवे नमः

ॐ मधुसूदनाय नमः

ॐ त्रिविक्रमाय नमः

ॐ वामनाय नमः

ॐ श्रीधराय नमः

ॐ हृषीकेशाय नमः

ॐ पद्मनाभाय नमः

ॐ दामोदराय नमः

ॐ संकर्षणाय नमः

ॐ वासुदेवाय नमः

ॐ प्रद्युम्नाय नमः

ॐ अनिरुद्धाय नमः

ॐ पुरुषोत्तमाय नमः

ॐ अधोक्षजाय नमः

ॐ नारसिंहाय नमः

ॐ अच्युताय नमः

ॐ जनार्दनाय नमः

ॐ उपेन्द्राय नमः

ॐ हरये नमः

ॐ श्रीकृष्णाय नमः

*या नंतर अक्षता हातात घेऊन खालील संकल्प करावा. त्यानंतर अक्षता पाण्यासहित ताम्हणात सोडाव्या.*

पूजाकर्म सुरु करण्याआधी परंपरेप्रमाणे श्रीगणेश, कुलदेवता, इष्टदेवता, कुलपुरुष,ग्रामदेवता,गुरु,माता, पिता, पितर, वास्तूदेवता, स्थानदेवता, सर्व देव,  ब्राह्मण या सर्वांना नमस्कार करून निमंत्रण देणे व त्यांचे आशीर्वाद घेणे आवश्यक आहे.

ॐ श्री गणेशाय नमः|

ॐ श्री कुलदेवताभ्यो नमः|

ॐ श्री इष्टदेवताभ्यो नमः|

ॐ श्री कुलपुरुषाय नमः|

ॐ श्री ग्रामदेवताभ्यो नमः|

ॐ श्री गुरुभ्यो नमः|

श्री मातृदेवो नमः|

श्री पितृदेवो नमः|

ॐ पितराय नमः|

वास्तुदेवताभ्यो नमः|

स्थानदेवताभ्यो नमः|

सर्वेभ्यो देवेभ्यो नमः|

सर्वेभ्यो ब्राह्मणेभ्यो नमः|

## कलशपूजा

कलशस्य मुखे विष्णू कंठे रुद्र: समाश्रितः |

मूले तत्र स्थितो ब्रह्मा मध्ये मातृगणा:  स्मृता:||

कलशाच्या मुखाशी श्रीविष्णू तर कंठाशी श्रीरुद्रदेवता वास करते.  तळाशी ब्रह्मा तर मध्यभागी मातृगणदेवता निवास करतात.

कुक्षौतु सागरा:  सर्वे सप्तद्विपा वसुंधरा|

ऋग्वेदोऽथयजुर्वेद: सामवेदोह्यथर्वण: ||

अङ्गेश्चसहिता: सर्वे कलशम्तु समाश्रितः|

कलश हे पृथ्वीचे प्रतीक असून त्यातील जलसागराचे व त्यातील सप्तद्वीपांचे प्रतिनिधित्व करते.  हे पवित्र जल ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्व या चारवेदांचे त्यांच्या सहा अंगांसहित विपुल ज्ञान व संपत्ती दर्शवते.

अत्र गायत्री सावित्री शांती: पुष्टिकरी तथा|

आयांतुदेवपूजार्थं दुरितक्षयकारिका:| |

या शांती, (विपुलता देणारी) पुष्टीकरी व अध्यात्मिक ऊर्जा व जागृती प्रदान करणाऱ्या गायत्री आणि सावित्री देवता देवपूजेला उपस्थित राहून सर्व बाधा अडचणींचे निवारण करोत.

गंगेच यमुनेचैव गोदावरी सरस्वती|

नर्मदे सिंधू कावेरी जलेस्मिन संनिधीकुरु||

गंगा, यमुना, गोदावरी, सरस्वती, नर्मदा, सिंधू, व कावेरी या पवित्र नद्यांचे पाणी या कलशात स्थित होऊन पूजेला अनुकूल होवो.

कलश देवताभ्यो नमः

सर्वोपचारार्थे गंधाक्षतपुष्पम समर्पयामि ||

## शंखपूजन

शंखादौचंद्रदेवत्यम कुक्षौवरुणदेवता |

पृष्ठेप्रजापतीश्चैव अग्रेगंगासारस्वती ||

त्वमपुरासागरोत्पन्नो विष्णुनाविधृता:करे |

शंखाच्या सुरुवातीला चंद्रदेवता, उदरात वरुणदेवता, पृष्टभागावर प्रजापती व अग्रावर गंगा आणि सरस्वती वास करतात. हा पवित्र (शंख) सागरातून उत्पन्न होऊन श्री विष्णूनी आपल्या हातात धारण केला आहे.

शंखदेवतायेनमः सर्वोपचारार्थे गंध पुष्पमतुलसीपत्रं समर्पयामि ||

आम्ही शंखदेवतेला नमस्कार करतो. चंदनगंधीत जल, फुले आणि तुळशीपत्र वाहून आम्ही तुला नमस्कार करतो.

## घंटापूजन

आगमर्थंतुदेवानां,गमनार्थंतुराक्षसां |

कुर्वेघंटारवंतत्र देवताह्वनलक्षणं ||

देवांचे स्वागत करण्यासाठी वराक्षसांच्या गमनासाठी, तसेच देवतांना आवाहन करण्यासाठी, आम्ही घंटानाद करतो.

घंटादेव्यैनमः

सकलपूजार्थे गंधाक्षतपुष्पम समर्पयामि ||

आम्ही घंटादेवतेला नमस्कार करून तिला अक्षता, फुले व गंध समर्पण करतो.

## प्रोक्षण

अपवित्रः पवित्रो वा सर्वावस्थामगतोSपिवा |

यःस्मरेंतपुण्डरीकाक्षं सबाह्याभ्यन्तरः शुचिः ||

अपवित्र, पवित्र किंवा इतर कोणत्याही अवस्थेतील व्यक्ती कमळाप्रमाणे नेत्र असलेल्या (श्रीविष्णूंचे ) स्मरण केल्यास अंतर्बाह्य शुद्ध होते.

*स्वतःच्या मस्तकावर व पूजा सामुग्रीवर तुळसीपत्राने वा फुलाने पाणी शिंपडावे.*

## दीपपूजन (समई)

शुभंकरोति कल्याणम आरोग्यम्धनसंपदा|

शत्रुबुद्धीविनाशाय दीपज्योती नमोस्तुते ||

या दिव्याची ज्योत आम्हाला कल्याणकारी असो व निरामय आरोग्य, धनसंपदा प्रदान करो.  आमच्यातील इतरांबाबत असलेली शत्रुभावना दूर करो.  आम्ही या पवित्र ज्योतीला नमस्कार करतो.

दीपदैवताय नमः|

सकलपूजार्थे गंधाक्षतपुष्पम्समर्पयामि ||

दीपदेवतेला नमस्कार. आम्ही अर्पण केलेल्या गंध, अक्षता व फुलांचा स्वीकार करावा.

## **ध्यान**

सर्व मङ्गल माङ्गल्ये शिवे सर्वार्थसाधिके |

शरण्ये त्र्यम्बके गौरि नारायणि नमोस्तुते ||

हे सर्वांचे मंगल (कल्याण) करणाऱ्या सर्वमंगले, साधकांच्या सर्व मनोकामना पूर्ण करणाऱ्या व त्र्यंबकेश्वराला (शंकरांना) प्रिय असणाऱ्या त्र्यंबके, आम्ही तुला शरण आलो आहोत. हे नारायणी, आम्ही तुला नमस्कार करतो.

ब्रह्मरूपे सदानन्दे परमानन्द स्वरुपिणी |

द्रुतसिद्धिप्रदे देवि नारायणि नमोस्तुते ||

हे ब्रह्मस्वरूपिणी, सदैव दैवी आनंद प्रदान करणारी, व परम आनंदात निमग्न असणारी, भक्तांना त्वरित सिद्धी प्राप्ती करून देणाऱ्या देवी नारायणीला आम्ही नमस्कार करतो.

शरणागतदीनार्त परित्राण परायणे |

सर्व स्यार्त्तिहरे देवि नारायणि नमोस्तुते ||

संसारतापाने त्रस्त होऊन शरण आलेल्या दीनजनांना संरक्षण देणाऱ्या व त्यांच्या सर्व दुःखांचा नाश करणाऱ्या देवी नारायणीला आम्ही वारंवार नमस्कार करतो.

ॐ श्री देवीचामुंडेश्वरी प्रीत्यर्थं आवाहनं समर्पयामि|

श्री देवीचामुंडेश्वरीला कृपा करून पूजास्थानी आम्ही केलेल्या उपासनेचा दयापूर्वक स्वीकार करण्याचे आवाहन करतो.

## **आसन**

अनेक रत्नसंयुक्तम नानामणि गणान्वितं |

कार्तस्वरमयंदिव्यमासनं प्रतिगृह्यताम् ||

हे देवी, अनेक रत्नांनी सुशोभित केलेल्या व विविध मौल्यवान मण्यांनी विभूषिलेल्या सुवर्णासनाचा स्वीकार कर व आसनस्थ हो.

ॐ श्री देवी चामुंडेश्वरी प्रीत्यर्थं आसनं समर्पयामि||

श्री देवी चामुंडेश्वरीला स्थानापन्न होण्यासाठी आम्ही आसन समर्पित करतो.

## पाद्यप्रक्षालन

गङ्गादि सर्वतीर्थ्ये भोमया प्रार्थनायाह्रुतम् |

तोयमेतत्सुखस्पर्श पाध्यार्थं प्रतिगृह्यताम् ||

गंगेसारख्या पवित्र तीर्थाने मी श्रीदेवीच्या चरणांना प्रक्षालन करून प्रार्थना करीत आहे. या सुखदायी जलस्पर्शाचा स्वीकार करून श्रीदेवी आमच्यावर प्रसन्न होऊन कृपादृष्टी ठेवो.

ॐ श्री देवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थं पाद्यं समर्पयामि ||

श्री  देवी चामुंडेश्वरीला पदकमले स्वच्छ करण्यासाठी आम्ही जल समर्पित करतो.

## अर्ध्यसमर्पण

गन्ध्पुष्पाक्षतैर्युक्तमर्घ्यंसंपादितंमया |

गृहाणत्वंमहादेविप्रसन्नभवसर्वदा ||

सुगंधीद्रव्य, अक्षतावफुलांनीयुक्तजलानेदेवीचरणीमीअर्ध्यदेतआहे. हेमाते, याचा स्वीकार करून माझ्यावर तुझी सदैव कृपा दृष्टी ठेव.

ॐ श्रीदेवी चामुंडेश्वरी प्रीत्यर्थं अर्ध्यं समर्पयामि ||

श्रीदेवी चामुंडेश्वरी प्रीत्यर्थ जल समर्पित करतो.

## आचमन

आचम्यतां त्वया देवि भक्तिमेह्यचलांकुरु |

ईप्सितं मे वरंदेहि परत्रचपरांगतिम् ||

हे ईश्वरी, तुझ्या आगमनानंत आचमनासाठी आम्ही तुला जल प्रदान करत आहोत. तुझ्या कृपेने आमची भक्ती अचल (स्थिर) राहू दे. आमच्या सर्व मनोकामना (इप्सित) पूर्ण होऊन आम्हाला (परलोकात) चांगली गती मिळो.

ॐ श्रीदेवी चामुंडेश्वरी प्रीत्यर्थं आचमनीयं जलमसमर्पयामि ||

श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थ आचमनासाठी जल समर्पित करतो.

*देवीच्या मूर्तीच्या पायावर जल सोडावे.*

## पंचामृत स्नान

पयोदधिघृतंक्षीरं सितयाचसमन्वितम् |

पञ्चामृतमनेनाद्यकुरु स्नानंदयानिधे ||

हे दयासागराप्रमाणे कृपाळू माते, सर्व प्रथम दुग्ध, दही, तूप, इत्यादी द्रव्यांचा समावेश असलेल्या शीतल पंचामृत आम्ही तुला स्नानासाठी अर्पण करतो.

ॐ श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थं पंचामृत स्नानं समर्पयामि ||

श्रीदेवी चामुंडेश्वरीसाठी पंचामृत स्नान समर्पण करतो.

*देवी मूर्तीवर पंचामृताने अभिषेक करावा.*

पञ्चामृत स्नानान्तरेन शुद्धोदकस्नानं समर्पयामि||

हे देवी, पंचामृतस्नानानंतर आम्ही तुला शुद्धजलाने स्नान अर्पण करतो.

*श्रीदेवीला साध्या पाण्याने अभिषेक करून मूर्ती स्वच्छ करावी.*

## वस्त्र

वस्त्रंच सोमदैवत्यंलज्जायास्तुनिवारणं |

मया निवेदितं भक्त्या गृहाण परमेश्वरी ||

ॐ श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थं वस्त्रं समर्पयामि ||

आम्ही तुझ्या चरणी लज्जारक्षणार्थ भरजरी सुंदर वस्त्रे समर्पित केली आहेत. (हे देवी) यांचा स्वीकार करून आम्ही निवेदिलेल्या इच्छा पूर्ण कर.

*श्रीदेवीला कार्पासवस्त्रे अथवा खण अथवा साडी अर्पण करावी.*

## आभूषणसमर्पण

हारकङ्कन्केयूरमेखला कुण्डलादिभिः ||

रत्नाढयंकुंडलोपेतं भूषणंप्रतिगृह्यताम् ||

(हे देवी), आम्ही तुझ्या चरणीहार, हस्तकंकण, बाहूकंकण, कमरपट्टा, कर्णकुंडले इत्यादी रत्नखचित अलंकार समर्पण करतो. कृपया यांचा स्वीकार करावा.

ॐ श्रीदेवीचामुंडेश्वरीप्रीत्यर्थं आभूषणं समर्पयामि ||

*श्रीदेवीला आपल्या इच्छेप्रमाणे दागिने अर्पण करावेत अथवा दागिन्यांचे प्रतीक म्हणून अक्षता वाहाव्यात.*

## चंदन

परमानन्द सौभाग्यं परिपूर्ण दिगन्तरे |

गृहाण परमंगन्धं कृपया परमेश्वरि ||

ॐ श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थं चंदनं समर्पयामि ||

(हे देवी) परम आनंद आणि सौभाग्यप्रदान करणाऱ्या व  सर्व दिशांना दरवळणाऱ्या चंदन गंधाचा स्वीकार करून आमच्यावर कृपा दृष्टी ठेव.

## कुंकुम

कुंकुमं कान्तिदंदिव्यं कामिनी कामसंभवं |

कुंकुमेनार्चितेदेवि प्रसीद परमेश्वरि ||

ॐ श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थं कुंकुममं समर्पयामि||

सौंदर्य वाढवणाऱ्या व दिव्यता प्रदान करणाऱ्या कुंकुमाने आम्ही तुझी अर्चा करतो.  हे देवी तुझ्या कृपाप्रसादाने आमचे कल्याण होवो.

*श्रीदेवीला कुंकू अर्पण करावे.*

## काजलCollyrium

कज्जलं कज्जलं रम्यं सुभगे शान्तिकारिके |

कर्पूर ज्योतिरुत्पन्नंगृहाण परमेश्वरि ||

ॐ श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थं कज्जलं समर्पयामि ||

तूप व कर्पूरज्योतीपासून उत्पन्न होणाऱ्या, आकर्षकता प्रदान करणाऱ्या आणि सौंदर्यासहित (नेत्रांना)  शांती देणारे काजळ अर्पण करून त्याचा स्वीकार करावा अशी आम्ही तुला विनंती करतो.

## मंगलद्रव्यवसौभाग्यसूत्र

सौभाग्यसूत्रंवरदे सुवर्णमणिसंयुते |

कण्ठेबध्नामिदेवेशि सौभाग्यंदेहिमेसदा ||

ॐ श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थं सौभ्याग्यसूत्रं समर्पयामि ||

हे देवी, सौभाग्य प्रदान करणाऱ्या व सुवर्णमण्यांनीयुक्त माला (कंठसूत्र) आम्ही तुझ्या गळ्यात अर्पण करत आहोत. त्याचा स्वीकार करून आम्हाला भाग्यशाली कर.

श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थ सुवर्णाचे कंठसूत्रं अर्पण करत आहे.

***** (श्रीदेवी चामुंडेश्वरी ही कुमारिका असल्याचा विश्वास असलेले बरेच भक्त देवीला मंगळसूत्र वाहात नाहीत. सर्व भक्तांनी आपापल्या समजुतीप्रमाणे या बाबतीत निर्णय घ्यावा) *****

## सुगंधीद्रव्य

चन्दनागरुकर्पूरैः संयुतंकुंकुमंतथा |

कस्तूर्यादिसुगन्धाश्च सर्वाङ्गेषुविलेपनं ||

ॐ श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थं सुगंधित द्रव्यं समर्पयामि ||

हे ईश्वरी, चंदन, आगर, कर्पूर, कुंकुम तसेच कस्तुरी इत्यादी सुंगधी व शुभवस्तुंनी संपन्न सुगंधी द्रव्याने सर्वांगाला लेपन केले आहे. आमच्यावर प्रसन्न होऊन कृपा दृष्टी ठेव.

## हरिद्रासमर्पण

हरिद्रारञ्जितेदेवी सुखसौभाग्यदायिनी |

तस्मात्त्वांपूजयाम्यत्र सुखशान्तिंप्रयच्छमे ||

मन प्रसन्न करणाऱ्या व सुख सौभाग्य देणाऱ्या हळदीचे चूर्ण आम्ही तुला अर्पण करितो. तुझ्याकृपेने आम्हाला सुख व शांती प्राप्त होवो.

ॐ श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थं हरिद्राचूर्णं समर्पयामि

श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थ हळदीचे टिळकलेपन समर्पण करीत आहोत.

## अक्षतासमर्पण

रञ्जितःकंकुमौध्येनन अक्षताश्चातिशोभनः |

ममैषादेविदानेन प्रसन्न भव शोभने ||

ॐ श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थं अक्षतांसमर्पयामि||

शोभादायक व प्रसन्नता देणाऱ्या कुंकुमानेलिप्त अक्षता आम्ही तुला प्रदान करतो. हे देवी, आमच्यावर सदैव प्रसन्न रहा.

*श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थ अक्षता वहाव्यात.*

## पुष्पांजलीFloral tribute

मन्दार पारिजाता दिपाटलीकेतकानिच |

जाति चम्पकपुष्पाणि गृहाणिमाने शोभने ||

जास्वंद, गुलाब, पारिजातक, पर्णयुक्त केवडा, चाफा इत्यादी सुगंधी फुले आम्ही तुला वाहतो. (हे देवी) कृपया आमच्या पुष्पांजलीचा स्वीकार कर.

ॐ श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थं पुष्पांजली समर्पयामि ||

श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थ फुले समर्पित करत आहोत.

## फुलांसाठी वापरले जाणारे समानार्थी संस्कृत शब्द

Daisy – भृंगराज, Dahlia – दलियापुष्पम, Lotus – कमल,

Jasmine – चमेली, Marigold – सेवंतिका

Hibiscus – रक्तपुष्पम or जास्वंद or जपाकुसुम,

## बिल्वपत्र

अमृतोद्भव: श्री वृक्षोमहादेविप्रिय: सदा |

बिल्वपत्रंप्रयच्छामि पवित्रं ते सुरेश्वरि ||

श्रीदेवीला (लक्ष्मी) बेलवृक्ष अत्यंत प्रिय आहे. अमृताप्रमाणे गुणकारी बेलवृक्षाची पाने आम्ही तुला समर्पित करतो. कृपया यांचा स्वीकार करून आमचे संरक्षण कर.

## धूपसमर्पण

दशांगगुग्गुलधूपं चन्दनागरुसंयुतम् |

समर्पितंमया भक्त्या महादेविप्रति गृह्यताम् ||

गुग्गुल, चंदन व कोरफडीपासून बनविलेल्या प्रज्वलित धुपाने आम्ही तुझी सेवा करतो. कृपया आमची सेवा स्वीकार कर.

ॐ श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थं धूपम समर्पयामि ||

## दीपसमर्पणLighting of the Lamp

घृतवर्त्तिसमायुक्तं महातेजो महोज्ज्वलम् |

दीपंदास्यामिदेवेशि सुप्रीता भवसर्वदा ||

ॐ श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थं दीपं समर्पयामि||

हे ईश्वरी, घृत (तूप) युक्त तेजोमय प्रज्ज्वलित दीपक ओवाळून आम्ही तुझी सेवा करतो. तू आमच्यावर सदैव प्रसन्न राहा.

## नैवेद्यं

देवीसमोर  ठेवलेल्या नैवेद्याभोवती प्रत्येकवेळी डावीकडून उजवीकडे वर्तुळाकार पाणी, अक्षता व फुले फिरवून अनुक्रमे खालील वाक्यांचा उच्चार करावा.

ॐप्राणायस्वाहा

ॐअपानायस्वाहा

ॐव्यानायस्वाहा

ॐउदानायस्वाहा

ॐसमानायस्वाहा

ॐ श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थं नैवेद्यं समर्पयामि

देवीवर प्रत्येकवेळी फुलांनी पाणी शिंपडून अनुक्रमे खालील प्रार्थना करावी.

उत्तरापोषणं पानीयं समर्पयामी

भोजनोपरांत प्राशनासाठी जल समर्पित करतो.

मुखप्रक्षालनं पानीयं समर्पयामि

मुख प्रक्षालनासाठी (स्वच्छ करण्यासाठी) जल समर्पित करतो.

हस्तप्रक्षालनं पानीयं समर्पयामि

हात स्वच्छ करण्यासाठी जल समर्पित करतो.

नमस्करोमी

नैवेद्य ग्रहण केल्याबद्दल कृतज्ञतेने तुला नमस्कार करतो.

## नैवेद्यातील काही वस्तूंचे वर्णन

| | |
|---|---|
| भोजनम सर्मर्पयामि - | पूर्णजेवण |
| कर्दळीफलं सर्मर्पयामि - | केळी |
| नारिकेलफ़लं सर्मर्पयामि - | नारळ |
| क्षीरम सर्मर्पयामि - | दुग्ध |
| क्षीरान्न सर्मर्पयामि - | खीर |
| गुडशकला सर्मर्पयामि - | गुळाचेखडे |

ॐ श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थं नैवैद्यम सर्मर्पयामि ||

## ऋतूप्रमाणे प्राप्त होणारी फळे Offering of Seasonal fruits

द्राक्षाखर्जूरकदलीफल साम्रकपित्यकम |

नारिकेलेक्षुजम्बादिफला निप्रतिगृह्यताम्||

ॐ श्री चामुंडेश्वरीप्रीत्यर्थं ऋतुफलानि सर्मर्पयामि ||

द्राक्ष, खजूर, केळी, आंबा, नारळ, ऊस, जांभुळादि फळे आम्ही तुला समर्पण करतो. हे देवी, (आमच्या सेवेचा) स्वीकार कर.

## माहितीसाठी फळांची संस्कृत नावे

*१. नारिकेल – नारळ*

*२. सेवम – सफरचंद*

*३. कालिंगं – कलिंगड*

*४. कदलिका – केळे*

*५. आम्रम – आंबा*

*६. अनासं – अननस*

*७. दाडिभम- डाळिंब*

*८. पनसम – फणस*

*९. द्राक्षफल्म – द्राक्षे*

*१०. नारिंगम – संत्रे*

*११. जंबीरं – मोसंबी*

*१२. आग्रलम – पेरू*

*१३. अमृतम – पेर*

*१४. खरबूजं – टरबूज*

*१५. खर्जुरं – खजूर*

*१६. इक्षुदंड - ऊस*

## आचमनAchaman (Sip of water for self-purification)

कामारि वल्लभेदेविकर्वाचमनमम्बिके |

निरन्तरमहंवन्दे चरणौतवचण्डिके ||

मदनांतक शिवशंकराला प्रिय असणाऱ्या हे पार्वती, नैवेद्यानंतर प्राशन करण्यासाठी (आचमनासाठी) आम्ही समर्पिलेले जल स्वीकार कर. हे चंडिके, तुझी अनंत काळ सेवा करण्यासाठी आम्हाला तुझ्या कमलचरणी कायमस्वरुपी स्थान दे.

ॐ श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थं आचमनीयं जल समर्पयामि ||

## नारिकेलOffering of Coconut

नारिकेलंचनारङ्गी कलिङ्गमञ्जीरंत्वा |

उर्वारुकचदेवेशि फलान्येतानिगह्यताम् ||

हे देवी, तुझ्यासाठी आम्ही श्रीफळ, संत्री, कलिंगड, काकडी समर्पित करीत आहोत. यांचा स्वीकार करून आमच्यावर कृपा करावी.

ॐ श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थं नारिकेलफळं समर्पयामि ||

## तांबूलOffering of Betel leaves with Betel nut

एलालवङ्गं कस्तुरी कर्पूरैःपुष्पवासिताम् |

वीटिकांमुखवासार्थ समर्पयामिसुरेश्वरि ||

वेलची, लवंग, कस्तुरी, कर्पूर आणि फुले यांच्या मिश्रणाने निर्मिलेला विडा आम्ही तुला सुगंधी मुखवास म्हणून देत आहोत. त्याचा स्वीकार करून, हे सुरेश्वरी (देवांची देवता), आमच्यावर प्रसन्न हो.

ॐ श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थं ताम्बूलंसमर्पयामि ||

## दक्षिणा Donation

पूजाफलसम्रुद्ध यर्थ्तवाग्रेस्वर्णमीश्वरी |

स्थापितंतेनमेप्रीता पूर्णानकुरु मनोरथम् ||

हे सुवर्णकांती धारण करणाऱ्या देवते, आम्ही आमच्या पूजेचे अनुकूल फळ मिळावे म्हणून तुझ्यासमोर दक्षिणा (अर्थ) अर्पण करीत आहोत. या दक्षिणेचा प्रेमाने स्वीकार करून आमचे मनोरथ पूर्ण करावे.

ॐ श्री चामुंडेश्वरीप्रीत्यर्थं दक्षिणां समर्पयामि ||

हे देवी, आम्ही तुला दक्षिणा अर्पण करतो. कृपया दक्षिणेचा स्वीकार करून आमचे मनोरथ पूर्ण कर.

## दीपपूजा (समई) Worship of lamp (fire)

शुभं भवतु कल्याणमारोग्यं पुष्टिवर्द्धनम् |

आत्मतत्त्वप्रबोधाय दीपज्योतिर्नमोऽस्तुते ||

आम्ही (अग्निदेवतेचे प्रतीक) दीपज्योतीला नमस्कार करतो. देवीला अर्पिलेला ह्या प्रज्ज्वलित दीपाने आमचे शुभ कल्याण होऊन आम्हाला आरोग्य प्राप्ती तसेच आत्मतत्वाचे ज्ञान होवो.

ॐ श्रीदेवी चामुंडेश्वरी नमः दीपंपूजयामि ||

## नीरांजन Neerajan

नीराजनंसुमाङ्गल्यं कर्पूरेणसमन्वितम् |

चन्द्रार्कवह्निसदृशं महादेविनमोस्तुते ||

कर्पूरमिश्रित, चंद्रप्रकाशाप्रमाणे सौम्य, सूर्याप्रमाणे तेजस्वी व अग्नीप्रमाणे तप्त आणि मांगल्याचे प्रतीक नीरांजन आम्ही तुला समर्पित करून तुला नमस्कार करीत आहोत.

ॐ श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थं कर्पूर नीराजनं समर्पयामि ||

## प्रदक्षिणा Circumambulation

प्रदक्षिणंत्रयंदेवि प्रयत्नेन प्रकल्पितम् |

पश्याद्यपावनेदेवि अम्बिकायैनमोऽस्तुते ||

हे अंबिके, आम्ही तुला नमस्कार करतो. अत्यंत प्रयत्नाने (पूजाकर्म) पार पाडून आम्ही तुला प्रदक्षिणा घालत आहोत. (पूजाउपरांत) आम्हाला तुझे आशीर्वाद प्राप्त होवोत.

ॐ श्रीदेवी चामुंडेश्वरीप्रीत्यर्थं प्रदक्षिणां समर्पयामि

*यानंतर श्रीदेवी चामुंडेश्वरीचा नवार्णमंत्र जप किंवाचंडीकवच, श्रीसूक्त व लक्ष्मीसूक्त स्तोत्राचे पठण किंवा आपल्या दुसऱ्या एखाद्या आवडीच्या मंत्राचा/स्तोत्राचा जप किंवा नामस्मरण करावे.*

*सर्वात शेवटी पूजेदरम्यान झालेल्या त्रुटी किंवा चुकांची माफी मागावी.*

## क्षमापन Seeking pardon

आवाहनं न जानामि न जानामि तवार्चनं

पूजाचैव न जानामि क्षम्यतां परमेश्वरी

क्षम्यतां परमेश्वरी क्षम्यतां परमेश्वरी

हे ईश्वरी, आम्हाला तुला आवाहन कसे करावे व अर्चा कशी करावी याचे ज्ञान नाही. पूजा कशी करावी याची ही माहिती नाही. आम्ही आमच्याकडून पूजेदरम्यान अज्ञानाने झालेल्या चुकांची त्रिवार माफी मागतो.

अपराधशतं देविमत्कृतंच दिने दिने |

क्षम्यतां पावने देवि-देवेशनमोSस्तुते ||

आमच्या दैनंदिन जीवनात आमच्याकडून शेकडो अपराध घडतात. हे देवांना पूज्य असलेल्या देवते, आम्ही तुझ्याकडे आमच्या अपराधांची माफी मागतो. कृपया आमच्यावर प्रसन्न हो!